**Price Rs.: 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया, पेन्शनर्स असोसिएशन, (मुंबई सर्कल), पुणे

ह्यांची गृहपत्रिका

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

# संवाद

मनामनांचा मेळ जुळावा द्वेषाचा लवलेश नसावा
सादासी प्रतिसाद मिळावा वाद नको संवाद असावा

वर्ष चौथे अंक पहिला फेब्रुवारी २००७ (February-2007)

**पणजी (गोवा) सब्-सेंटरच्या सभासदांसाठी -विशेष सूचना**

पान क्र. २ वर पणजी(गोवा) सब्-सेंटरच्या ९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस छापली आहे. या सभेची वेगळी नोटीस संबंधित सभासदांना पाठविली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**Panji (Goa) Sub-Centre Members Attention Please**

Please read the Notice of Panji (Goa) Sub-Center's 9th Annual General Meeting, printed on Page No. 2 of this issue. Please note that **No seperate Notice of the AGM** will be sent to the members.

## .......... संपादकीय ..........

प्रिय वाचक हो !

बघता-बघता आपला 'संवाद' तीन वर्षे पूर्ण करून आता नव्या उत्साहाने, ऊर्मीने आणि आत्मविश्वासाने चौथ्या वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने आम्ही आमच्या तमाम वाचकांना, सभासदांना, लेखक-कवि मित्रांना आणि हितचिंतकांना मानाचा मुजरा करीत आहोत. या प्रसंगी आमच्या मनात केवळ आनंदाची नि समाधानाची भावना आहे. 'संवाद' ने प्रथमपासून शिरोधार्य मानिलेल्या आपल्या ब्रीदवाक्यानुसार आपली वाटचाल निष्ठेने चालू ठेविली आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. 'मनामनांचा मेळ जुळविण्या'त सतत प्रयत्नशील असणारा आपला 'संवाद'..., 'परस्परांतील द्वेषाची भावना पूर्णपणे नाहीशी व्हावी आणि परस्परात स्नेहबंध निर्माण व्हावेत' म्हणून नित्य धडपडणारा आपला 'संवाद'..., 'सादाला प्रतिसाद देण्यासाठी आणि प्रतिसाद मिळविण्यासाठीही' सदैव झटणारा आपला 'संवाद'... तसंच 'वाद-वादंग किंवा वितंडवाद टाळून परस्परांमध्ये निकोप व अर्थपूर्ण असा सुसंवाद साधण्यासाठी' प्रयत्नांची शर्थ करणारा आपला 'संवाद' आज तीन वर्षे यशस्वीपणे पूर्ण करून चौथ्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यामुळे आपणा सर्वांनाच अतीव आनंद नि समाधान वाटत असेल यात काय शंका ?

आपल्या स्टेट बँकेतून रीतसर निवृत्त झालेले आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले जे अनेक सभासद बंधु-भगिनी आज विविध समाजसेवी संस्थांमधून सक्रिय होऊन स्वत:ला समाज कार्यात झोकून देऊन मोलाचं कार्य करीत आहेत, त्या सर्वांचाच 'संवाद' ला अभिमान वाटतो. म्हणून आपले सभासद कार्यरत असलेल्या संस्थांच्या विविधांगी कार्याचा परिचय करून देण्याचा उपक्रम 'संवाद' ने कृतज्ञतेच्या नि कर्तव्यपूर्तीच्या भावनेतून चालू ठेवला आहे. त्यापासून इतर सभासदांना देखील समाज कार्याची प्रेरणा मिळावी हा या मागचा आमचा प्रामाणिक हेतू आहे.

आपले 'संवाद' रुपी माध्यम उत्तरोत्तर अधिकाधिक प्रभावी आणि समर्थ होत आहे याचा आम्हाला वेळोवेळी प्रत्यय येत असून त्यामुळे आम्हाला आमच्या वाढत्या जबाबदारीचीही जाणीव होत आहे. वाचकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत राहू याची वाचकांनी खात्री बाळगावी ही नम्र विनंती. वाचकांच्या, सभासदांच्या हाती 'संवाद' चा अंक पडल्यावर तो न वाचता रद्दीत दिला जात नाही, तर तो वाचला जातो. अगदी न विसरता आणि बारकाईने वाचला जातो. त्यामुळे आम्हाला अपेक्षित असलेलं विचार मंथनही घडतं. त्यावरील बऱ्या वाईट प्रतिक्रिया (बहुतेक वेळा चांगल्या व उत्साहवर्धक प्रतिक्रिया) 'संवाद' कडे, तसंच संपादक मंडळातील सदस्यांनादेखील पत्राद्वारे वा दूरध्वनीद्वारे सभासद वाचकांकडून तत्परतेने व अगत्यपूर्वक कळविल्या जातात हे 'संवाद' च्या यशाचे गमकच नव्हे काय ? वाचकांचं हे प्रेम, हा विश्वास यापुढेही कायम राहो अशी आमची परमेश्वरापाशी प्रार्थना आहे. सभासदांकडून 'संवाद' कडे विविध विषयांवरील येणारा साहित्याचा ओघ पुढे देखील तसाच चालू राहील असा आम्हाला विश्वास वाटतो.

'संवाद' च्या चौथ्या वर्षाच्या या वर्षारंभ अंकाच्या निमित्ताने आम्ही 'संवाद' च्या माध्यमाद्वारे देत असलेली सेवा यापुढेही निष्ठापूर्वक देण्याचं वचन आमच्या वाचकांना देत आहोत. 'संवाद' वर आपला असाच कृपालोभ असू द्यावा ही सर्वांनाच दोन्ही कर जोडोन आमची विनंती. धन्यवाद !

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले**

**State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune**
**Panaji (GOA) Zonal Sub-Centre**
**Notice of the Annual General Meeting**

9th Annual General Meeting of our Panaji (Goa) Zonal Sub-Centre will be held on Sunday the 25th March 2007 at 9.30 a.m. at State Bank Complex, Patto Plaza, behind Kadamba Bus Terminal, New Building of Staff Training Centre, Panaji (Goa) to transact the following business.

**AGENDA**

1) To condole the death of Bank's Pensioners/Family Pensioners and Associate members whose names were reported after the last AGM.
2) To confirm the Minutes of the last AGM.
3) Managing Committee's Report for the year 2006 to be read, discussed and adopted.
4) To honour the Senior Members who have completed/will be completing 75 years of age during the period from 26-03-2006 to 25-03-2007.
5) Speech of the Chief Guest
6) Speech of the President of Panaji (Goa) Sub-Centre
7) Speech of Mr. B. G. Dandekar, President of Federation of the Association, who is expected to attend the meeting as per our invitation.
8) Any other business with the permission of the Chair.

All the members from Goa, Ratnagiri & Sindhudurg Districts are requested to attend the meeting.

**The Pensioners' Meet** arranged by the Bank on the same day will start at **12.00 noon** at the same venue as above. All members in Ratnagiri/Sindhudurg Districts and Panaji (Goa) Module area of operation are requested to attend the meeting. **Please inform other members known to you regarding AGM.**

Snacks/Tea will be followed by lunch. Please note that no separate Notice of this Annual General Meeting will be sent to the members.

**I. H. Dias**
**Secretary**

**स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे**
**पणजी (गोवा) झोनल सब-सेंटर**
**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटिस**

पणजी झोनल सब्-सेंटरची ९ वी वार्षिक सर्व साधारण सभा रविवार दि. २५ मार्च २००७ रोजी सकाळी ९ ।। वाजता स्टेट बँक कॉम्प्लेक्स, पट्टो प्लाझा, कदंब बस टर्मिनलचे मागे, स्टाफ ट्रेनिंग सेंटर (नवीन इमारत), पणजी (गोवा) येथे आयोजित केली आहे. या सभेत खालील कामकाज होईल.

**कार्यक्रम पत्रिका**

१) गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ज्या मृत सभासदांची नांवे कार्यालयास कळविलेली आहेत अशा मृत सभासदांना श्रद्धांजली वाहणे.
२) गतवर्षीच्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे
३) कार्यकारी मंडळाच्या २००६ सालच्या अहवालास मंजूरी देणे.
४) २६-०३-०६ ते २५-०३-०७ या कालावधीत ज्यांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झालीत/होतील अशा सर्व ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करणे.
५) माननीय प्रमुख पाहुण्यांचे भाषण.
६) माननीय अध्यक्षांचे भाषण.
७) माननीय श्री.बी.जी.दांडेकर, फेडरेशनचे अध्यक्ष, यांचे मार्गदर्शनपर भाषण
८) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

गोवा तसेच रत्नागिरी/सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व सभासदांना विनंती की त्यांनी वरील वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित रहावे. तसेच वर उल्लेख केलेल्या सभास्थानी **त्याच दिवशी दुपारी १२ वाजता आपल्या बँकेने पेन्शनर्स सभा (Pensioners' Meet)** आयोजित केली आहे. तरी याही सभेस सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती. कृपया वरील दोन्ही सभांबद्दल आपल्या ओळखीच्या सभासदांना सूचना द्यावी.

चहा/अल्पोपहाराची व्यवस्था सभास्थानीच केली आहे. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेची वेगळी नोटीस सभासदांना पाठविली जाणार नाही याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

**आय.एच्.डायस**
सेक्रेटरी

**Correction in Report of the Managing Committee of the Mumbai Zonal Sub-Centre printed in 'SAMVAD' for January 2007**

It has been wrongly reported on page 7, para 6 of January 2007 issue of 'SAMVAD' that the Memorandum has been handed over to the Finance Minister. The correct position is that the memorandum is still under preparation and is yet to be handed over to the Finance Minister which please be noted.

**- Secretary, Mumbai Z.S.C.**

**On Federation front :**

We reproduce below the contents of the letter addressed to the Chairman of our Bank by President of our Federation on 5th February 2007 regarding need for revision in Family Pension.

*************************************

**Federation of State Bank of India Pensioners' Associations**

Ref.No.83 of 2006-07 Date : 5th February 2007

The Chairman,
State Bank of India
Corporate Centre,
Mumbai

Sir,

**Need to revise 'Family Pension Scheme' in State Bank of India**

1. We have been representing from time to time about the above subject. For ready reference we give below references of a few letters:-
   1. Letter No.39 of 10-05-1995
   2. Letter No. FED/46/97 OF 25-07-1997
   3. Notice dated 22-05-1998 served on the Bank by our Advocate
   4. Letter No.FED/40/98 of 13-07-1998 forwarding our "Charter of Demands"
   5. Letter No.15 of 10-04-1999
   6. Note dated 17-01-2000 discussed on 28-02-2000 with the top Executives of the Bank (Shri.S.R.Iyer, Managing Director, Shri.Y.Radhakrishnan, Dy.M.D. and others)
   7. Latest letter No.7 of 9-5-2006.
2. As you are aware, our demands in this regard can be summarized as follows:
   (a) The Family Pension at flat rate of 30% of actual 'Pay' drawn by an employee at the time of retirement/death be sanctioned to all existing and future family pensioners of Imperial Bank of India/State Bank of India with retrospective effect from 1-11-1987 without any ceiling (as there is no revision since 1-11-1987).
   (b) Minimum family pension should be fixed keeping in view the existing minimum family pension of Rs.300/- p.m. which is based on the salary scales wherein dearness allowance up to 332 points was merged, as stated in various circulars issued by the Bank from time to time and even in the Supreme Court Judgment dated 23-2-1989.
   (c) Dearness relief rates applicable to Family Pensioners should always be at par with the rates applicable to pensioners of the Bank.
   (d) You may please pay the arrears of dearness relief from 1-11-1993 to 30-4-2005 by extending the rates of dearness relief as applicable to pensioners of the Bank during that period.

3. The Central Board of the State Bank of India is empowered under Section 50 of the State Bank of India Act,1955 to make regulations after consultation with the Reserve Bank of

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा – पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, अकोला

India with the previous sanction of the Central Government. Such regulations may, inter alia, provide for the establishment and maintenance of a pension fund for the benefit of the employees of the Bank.

4. In exercise of clause (o) of sub-section (2) of the said section 50 of the Act the Central Board, after consultation with the Reserve Bank of India and with the previous sanction of the Central Government framed regulations known as the "State Bank of India Employees' Pension Fund Rules".

5. Rule 23(5) of the said Pension Fund Rules empowers the Trustees of the fund to sanction Family Pension to the dependents of an employee who is a member of the Pension Fund Scheme, in the event of the death of such a member (i) while in service of the Bank after completion of pensionable service of one year or (ii) after retirement.

6. The terms and conditions for sanction of Family Pension under Rule 23(5) are to be approved by the Central Board. In other words, by virtue of Rule 23(5) the Central Board has already been empowered by the Central Government to sanction Family Pension on such terms and conditions as the Central Board of the Bank may deem fit and proper. Such power has already been delegated to the Central Board by the Central Government by virtue of rule 23(5) after the same had been framed in consultation with the Reserve Bank of India as mandated by Section 50 of the State Bank of India Act,1955. Therefore, in our view, it is not at all necessary for the Central Board to once again go through the process of consultation and/or sanction at least in so far as the revision of the State Bank of India Family Pension Scheme is concerned.

7. In the light of the above, we once again request you to kindly consider our reasonable request which is nothing but a request for social justice and which is based on the recommendations of the 5$^{th}$ Pay Commission. In this connection, for your information, we reproduce below an extract from the Supreme Court Judgment dated 23-2-1989 :-

> "Now, the inspiration for the introduction of this Family Pension Scheme as a welfare measure for Bank employees comes from an identical family pension scheme recommended by the Commission. This becomes evident on a perusal of the recommendations contained in paragraph 6.8 of Chapter VI, Part II of the Report"

We are willing to discuss the matter and assist in whatever manner for achieving this objectives as non-revision of the Family Pension is a long standing cause of injustice to thousands of dependents whom inter alia we represent.

Thanking you.

Yours sincerely,
Sd/-
B.G.Dandekar
President

**डि. ए. सर्क्युलर संबंधी खुलासा**

**फेब्रुवारी २००७ ते जुलै २००७ या कालावधीसाठी डी. ए. संबंधीचे नवे सर्क्युलर 'संवाद'च्या छपाईच्या अंतिम दिनांकापर्यंत (१५ फेब्रुवारी) सेंट्रल ऑफिसने काढलेले नसल्याने 'संवाद'च्या ह्या अंकात देऊ शकत नाही.**

**- सेक्रेटरी**

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ ठाणे - मुलूंड

### '<u>अत्रेकट्टा</u>'

आमच्या मंडळाच्या सदस्या श्रीमती संपदा वागळे आणि श्रीमती विदुला ठुसे यांनी स्थापन केलेल्या **'अत्रे कट्ट्याचे' सलग ३०० कार्यक्रम** पूर्ण झाले.

स्टेट बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या आणि स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ (ठाणे-मुलुंड) याच्या सदस्या विदुला ठुसे आणि संपदा वागळे या ३०० कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या ठाण्यातील अत्रे कट्टयाच्या शिल्पकार. कोणत्याही विषयावर बोला हे ब्रीदवाक्य असलेले मुक्त व्यासपीठ म्हणजे 'अत्रे कट्टा.'

'सकाळ' मधील 'पार्ल्यातील अत्रे कट्ट्याचा वर्धापन दिन' या बातमीने विदुलाचे लक्ष वेधले. मन पिंगा घालू लागले आपल्या ठाण्यातही असा अत्रे कट्टा असावा. संपदाला बातमी दाखवल्यावर तिच्याही मनात अत्रे कट्ट्याचा विचार रुजला. श्री. चंद्रसेन टिळेकर यांची भेट घेऊन त्यांनी पार्ल्याच्या 'अत्रे कट्ट्याचे' स्वरुप जाणून घेतले. श्री.विलास ठुसे यांचा भरघोस पाठिंबा आणि ठाण्याचे माननीय नगरसेवक श्री.भास्कर पाटील यांच्या सहकार्याने ९ मे २००१ रोजी अत्रे कट्ट्याचे स्वप्न साकार झाले. जिजाऊ उद्यानात स्वर्गीय आनंद दिघे यांच्या शुभहस्ते अत्रे कट्ट्याचे उद्घाटन झाले. 'अत्र्यांना मानवंदना' हे पहिले पुष्प अत्रेकट्ट्यावर गुंफले गेले. मैत्रिणी आणि परिसरातील श्रोत्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम रंगला. श्री.करमरकरांनी सांगितलेल्या अत्र्यांच्या आठवणी आणि ज्योती शहाणेचे कविता वाचन टाळ्या घेऊन गेले. दिवसेंदिवस कार्यक्रमांना बहर येत होता. ॐकाराने कार्यक्रमाची सुरूवात तर वार बुधवार निश्चित झाला. गायन, भजन, व्याख्याने, मुलाखती, कवितावाचन असे विविध प्रकारचे कार्यक्रम रंगत होते. जिजाऊ उद्यानाचाही जणु कायापालटच होत होता. स्टेट बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतलेली राधा कर्णिक ही सक्रीय कट्टेकरी झाली. सन्मित्र, ठाणेवैभव या स्थानिक वृत्तपत्रकारांनी प्रथमपासूनच कार्यक्रमाची नोंद घेतली. आता तर लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रांनी अत्रे कट्ट्यास कौतुकाचे स्थान दिले. अत्रे कट्ट्यास लाभलेल्या धवल यशात संपदाच्या संवाद कौशल्याचा आणि विदुलाच्या आयोजन कौशल्याचा फार मोठा वाटा आहे. अत्रे कट्ट्याने लोकांना मोकळेपणाने बोलायला शिकवले. वनौषधींचा ठेवा हे पुस्तक लिहिणाऱ्या पद्माताई खांबेटे अत्रे कट्ट्यावर प्रथमच बोलत्या झाल्या. नियोजित वक्ते उपस्थित राहू शकत नव्हते. तेव्हा श्री.प्रविण दवणेंनी मुलाखत देऊन केलेल्या सहकार्याबद्दल संपदा आवर्जून सांगते. मोहिनीताई निमकर, श्री.अप्पा खांबेटे, पितांबरीचे श्री.प्रभुदेसाई आणि श्री.एम्.वाय.गोखले हे सर्व अत्रे कट्ट्याचे आधारस्तंभ. डॉ.स्नेहलता देशमुख, डॉ.नरेंद्र जाधव, डॉ.आनंद नाडकर्णी, डॉ.संजय ओक, सीमा देव, रमेश देव, विसुभाऊ बापट अशा अनेक मान्यवर व्यक्तींनी सुजाण सुसंस्कृत श्रोत्यांना तृप्त केले. आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेले डॉ.विजय ढवळे, डॉ.मीना प्रभु, डॉ.अनंत लाभसेटवार, डॉ.गंगाधर मद्दीवार यांच्या भेटीने अत्रेकट्टा जागतिक स्तरावर पोचला.

संपदा, विदुला आणि त्यांच्या सहकारी यांच्यातील शिस्त, ऐक्य, कामाचे पूर्व नियोजन आणि व्यवस्थापन वाखाणण्याजोगे आहे. स्टेट बँकेच्या सेवेत असतांना स्थापन झालेल्या 'स्टेट बँक स्थानीय लोकाधिकार समिती, ठाणे शहर महिला आघाडी' साठी केलेल्या कामाचा अनुभव उपयुक्त ठरला. अत्रे कट्ट्याने आम्हाला आत्मविश्वास आणि समाजात स्वत:ची ओळख दिली असे संपदा व विदुला आनंदाने सांगतात. या यशस्वी उपक्रमानंतरचे 'सन्मान सावली' हे पुढचे पाऊल. त्यांच्या नवीन उपक्रमास हार्दिक शुभेच्छा !

**शरद गडकरी**
सचिव

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स ॲन्ड असोसिएशन मुंबई झोनल सब सेंटर

### - आमंत्रण -

आपणा सर्वांना विदित आहेच की मुंबई सब सेंटरने ठाण्यात एक छानशी जागा घेऊन तेथून आपले कार्यालय सुरू केले आहे. ह्या जागेचा पत्ता असा :

**ए ५, स्वामी सिद्धार्थ को.ऑ.हौ.सोसायटी,**
**स्वामी विवेकानंद रोड, नौपाडा,**
**ठाणे ४००६०२. टेलिफोन नं. २५४४६८३७**

ह्या जागेस मार्च २००७ अखेरीस एक वर्ष पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने बुधवार दि.१४/३/२००७ रोजी सकाळी ह्या वास्तुमध्ये उदकशांत व श्रीसत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांना विनंती करण्यात येते आहे की सर्वांनी त्या दिवशी सकाळी १० ते १२ ह्या वेळेत कार्यालयीन जागेत येऊन तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा.

तसेच, त्याच दिवशी म्हणजे बुधवार दि. १४/०३/२००७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता 'सहयोग मंदिर घंटाळी', ठाणे ह्या सभागृहात स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ, ठाणे मुलुंड ह्यांच्या सहकार्याने Eternity **एक संगीत यात्रा** तर्फे जुन्या मराठी व काही हिंदी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. सर्व सभासदांना ह्या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आग्रहाचे आमंत्रण आहे.

आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शान तर वाढेल आणि सर्वांचा आनंद द्विगुणित होईल.

**- स.ब.गोखले**, सचिव

## नागपूर झोनल सब सेंटर

नागपूर झोनल सब सेंटरची २००६-०७ ची वार्षिक सभा १ एप्रिल २००७ ला सुळे हायस्कूल, धंतोली, नागपूर येथे दुपारी ४ वाजता संपन्न होणार आहे. सभेत निवड समितीसमोर इच्छुक सभासद गेल्या ३ वर्षात पेन्शनर प्रति तसेच संस्थेप्रति केलेल्या सेवेचे विवरण मांडतील व त्यावरून निवड समिती एन जी मोरे सर्व्हिस अॅवॉर्ड २००६-०७ च्या विजेत्यांची निवड करतील. विदर्भातील सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की त्यांनी केलेल्या कार्याचा तपशील पोस्टाने वा स्वत: घेऊन समिती समोर मांडावा.

ह्या मिटिंगला मोठ्या संख्येने सभासदांनी हजर रहावे ही विनंती.

**जयंत वकील**
**सचिव**

## Report from Pune Zonal Sub Centre

List of SBI Pensioners was collected from P.P.G. Dept. LHO Mumbai and after identifying the nonmembers the lists were sent to District Units to enable them to bring those non members on the roll of Association.

Shri. Devdatta Modak, our member from Nashik unit, has donated his dwelling house to the Association of Blind for which act Nashik unit arranged function to felicitate Shri & Smt. Modak at Nashik.

Delegation of our members from Satara Unit gave a courtesy visit to C.G.M. during his visit to Satara. The C.G.M. expressed happiness over this visit. A new unit of Association is formed at Wai under the guidance of Shri. S.S. Deshpande Secretary and other office bearers of Satara unit.

**C. P. Kulkarni**
**Secretary**

## ❈ खुलासा

'संवाद' मध्ये प्रसिद्धीसाठी विविध प्रकारचे साहित्य येत असते. त्याची पोच पोस्टकार्डाने आम्ही देत असतो. आपल्या असोसिएशनच्या कार्याविषयी प्रतिक्रिया/सूचना आल्यास ती पत्रे कार्यकारी मंडळापुढे ठेवली जातात व त्याबाबत निर्णय घेतला जातो. ललित साहित्य विषयक मजकूरांची निवड मात्र संपादक मंडळ करत असते. त्यामुळे सभासदांनी गैरसमज करून घेऊ नये ही नम्र विनंती. - ***संपादक मंडळ***

## अमरावती युनिटचे वार्षिक स्नेह संमेलन २००६-२००७

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्श. असो. (मुंबई सर्कल) पुणे, अमरावती युनिटचे वार्षिक स्नेह संमेलन दि. २७ जाने. रोजी स्थानिक डॉ.जोशी हॉलमध्ये अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात पार पडले. संध्याकाळी ठीक ५ वा. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ.गोविंद कासट ह्यांचे हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर, श्री.एम्.पी.जोशी ह्यांचा ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल डॉ.कासट ह्यांनी शाल, श्रीफळ व मिठाई देऊन सत्कार केला. अमरावती शाखेत कार्यरत असलेले कथा लेखक श्री.सुरेश आकोटकर ह्यांनी त्यांच्या साहित्यिक अनुभूती कथन केल्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून आम्ही विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात ज्यांच्या Mirza Express ह्या एकपात्री विनोदी कार्यक्रमाची लोकांना आतुरता व कितीदाही पाहिला तरी पुन:पुन्हा तो ऐकावासा वाटतो, त्या डॉ. मिर्झा रफी अहमद बेग ह्यांनी ''मिर्झा एक्सप्रेस'' हा तुफान विनोदी कार्यक्रम सादर करून सर्वांना एकतास पर्यंत हास्य रसात डुंबवून ठेवले. त्यानंतर युनिटचे सहसचिव श्री.रमेश झामरे यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे कुशल संचालन श्री.श्याम कुऱ्हेकर यांनी केले.

**अविनाश निमदेव**
**सचिव**

## ❈ चित्र

धरतीच्या या फलकावरची अदृश्य ही लेखणी
चित्र रेखितो कलाकार तो निसर्ग रंगांनी.........
सात समुद्रांच्या शाईने ठिपके जोडियले
सरितांच्या नाजुक रेखांनी चित्रबंध रेखिले
वेगवेगळ्या जागा भरल्या मातीच्या रंगांनी.........
सागराच्या लाटा कोरिती नक्षी पुळणीवरी
छाया काळी घनमेघांची कृष्णरंग ही भरी
चमचम चांदी कधी पाण्यावर कुणी दिली पसरूनी....
पाखरांची उडती झालर दिवसाच्या पडद्याला
सौदामिनीचे काठ शोभती रजनीच्या वस्त्राला
पडद्यांची या उघडझांप ही बनले दिनरजनी.........
रोज चालू हे प्रदर्शन परि आदि न त्याला अंत
गौरवाची निंदेची ना कलाकार करी खंत
वर्णन करण्या पडते अपुरी माझी स्तंभित वाणी.......

**सौ.उज्ज्वल र.ब्रम्हांडकर**
६१ सरभालचंद्र रोड, दादर, मुंबई १४

## आदर्श व्यक्तिमत्त्व - श्री देवदत्त मोडक

नाशिकमधील संघटनेचे एक सदस्य श्री देवदत्त मोडक, यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने साकारलेली वास्तू NAB या सेवाभावी संस्थेस दान करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे असे वाटते. श्री. देवदत्त मोडक शांत, अबोल, पुस्तकांच्या सान्निध्यात रमणारे व बुद्धिबळाच्या ६४ घरावर प्रेम करणारे आहेत. पण प्रत्यक्ष जीवनात शह काटशह, अर्थकारण व राजकारण यापासून ते कटाक्षाने दोन हात दूरच. कामात तत्पर. असे व्यक्तिमत्त्व ९ जाने. १९७९ रोजी नागपूर येथे स्टेट बँक परिवारात सामील झाले. श्री मोडक यांचे पिताश्री डॉ. महादेव मोडक नागपूरमधील सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्त्व. त्यांनी नागपूर विद्यापीठाचे रजिस्ट्रारपदाची धुरा ७ वर्षे यशस्वीपणे सांभाळली, यातच त्यांच्या शैक्षणिक कार्याची पावती मिळते. श्री देवदत्त मोडक यांनाही समाजासाठी काहीतरी ठोस काम करावे असे सतत वाटे, पण संधी मिळत नव्हती. ती संधी त्यांना नाशिकमध्ये आल्यावर मिळाली व ती त्यांनी साधली. नाशिकचे सांस्कृतिक वातावरण, सुंदर निसर्ग यांच्या प्रेमात श्री. मोडक पडले. त्यांनी नाशिकला बदली मागितली. १९९१/१९९२ च्या दरम्यान श्री. मोडक नाशिकला आले आणि नाशिकचेच झाले. वास्तव्यासाठी एक सुंदर वास्तू नासिकमध्येच उभारली. २००१ साली श्री मोडक यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि आता ते आपल्या छंदात रमले आहेत. वाचनाचा, चिंतनाचा व्यासंग व साथीला ६४ घरांचा बुद्धिबळांचा पट यात दिवस कसा जातो हे कळत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. श्री. मोडक यांच्या सुविद्य पत्नी सौ. स्मिता मोडक, त्यांना त्यांचे छंद जोपासण्यास मोलाचे सहकार्य व प्रोत्साहन देत आहेत.

श्री. मोडक यांना सामाजिक व शैक्षणिक कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा त्यांच्या पिताश्रींकडून मिळाली. बँकेत असतांना सक्रिय सहभाग नोंदविण्याचे प्रयत्न झाले पण अपेक्षित यश आले नाही. अगर कोणी दखल घेतली नाही म्हणा. पण निवृत्तीनंतर पुन्हा एकदा समाजातील उपेक्षित दुर्लक्षितांसाठी कांही तरी ठोस काम करावे या विचारांनी जोर धरला व त्याच वेळी ते National Association For the Blind या संस्थेच्या संपर्कात आले व त्यांनी ज्या व्यक्तींच्या आयुष्यात कायमचा अंधार दाटला आहे, ज्यांना हा सुंदर निसर्ग, आकाश, पक्षी पहाण्यापासून वंचित रहावे लागले आहे, त्यांचे जीवन अधिक सुसह्य कसे होईल यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. श्री.देवदत्त मोडक यांनी सौ. मोडक यांच्या साथीने विचार त्वरित अंमलात आणला.

आपल्या कष्टाने, स्वकर्तृत्वाने उभारलेली वास्तू, 'उषा किरण' सोसायटी नाशिक मधील एका उच्चभ्रू वस्ती मधील संपूर्ण बंगला त्यांनी NAB या संस्थेस दान केला आहे. त्या ठिकाणी ज्यांच्यामुळे प्रेरणा झाली ते त्यांचे पिताश्री डॉ. मोडक यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून तेथे 'डॉ. एम्.एस्. मोडक अंधांचे पुनर्वसन केंद्र' सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारे समाजाचे ऋण फेडण्याची संधी त्यांनी साधली आहे. आज समाजासाठी आपण कांहीतरी केले याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर जाणवते आहे. श्री देवदत्त मोडक यांचा हा आदर्श उपक्रम इतरांनाही प्रेरणादायक ठरेल असा विश्वास वाटतो.

***- वा.रा.बेळे, नाशिक***

### महान तू .....

कल्पनेतले चंद्र तारे डोळ्यांसमोर चमचमले
महापुराचे पाणी जेव्हा छतापर्यंत घरात शिरले
आयुष्यास का म्हणती जीवन कोडे जेव्हा उलगडले
रुप त्याचे पाहाता पाहाता तोंडचेच पाणी पळाले
क्षणाहूनही लहान घटिका का म्हणती तिजला पळ
अर्थ तिचा पुरता कळला घरातून काढता पळ !
'अर्थ'हीन झालो आता शोधू कशाकशाचा अर्थ
तूच महान बा निसर्गा ! केलीस तू अति शर्थ !!

**- सौ.ज्योती सूर्यकांत बागुल,**
बोरीवली (प.) मुंबई
दूरध्वनी : २८९१३७९७

### प्रयत्न

पाहू नका किती दूर आहे
किती लांब मार्ग आहे......
विचार करू नका तुमच्या बरोबर
आज किती पर्यंत जग आहे
ध्येय प्राप्ति साठी बलिवेदीवर
वापरा आपले तन मन
कधी नका सोडू आपली हिम्मत (शान)
प्रयत्ना अंती परमेश्वर !

**अशोक बुटाला, मुंबई**

असोसिएशनच्या कार्यास शुभेच्छा – पृष्ठ प्रायोजन : एक हितचिंतक, दादर मुंबई

# ❁ सिंगापूर बँकॉक मलेशिया सुखद अनुभव

सिंगापूर बँकॉक पहाण्याची फार इच्छा होती. हा योग केसरी टूर्स मार्फत झाला. सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी मुंबईहून आमचे विमान सिंगापूरकडे निघाले. रात्रौ ७ वाजता आम्ही सिंगापूरला पोहोचलो. (सिंगापूरची वेळ भारताच्या वेळेपेक्षा २ ॥ तास पुढे आहे) आमची बँकाँकची फ्लाईट ८ ॥ वाजता होती.

बँकॉकला पोहोचलो तेव्हा रात्रीचे १० वाजले होते. तेथून एसी कोचने रात्रौ ११ ला आम्ही अल्टीयम हॉटेलमध्ये पोहोचलो. सबंध दिवसाच्या विमान प्रवासामुळे थकून गेलो होतो. रात्री झोप कधी लागली समजले नाही. दुसऱ्या दिवशी नाष्टा करून पट्टायाकडे प्रयाण केले. आमचा २ दिवसाचा मुक्काम पट्टाया सेंट्रल हॉटेलमध्ये होता. दुपारी वाँग वूच व्हिलेजला भेट दिली. तेथे पॉट दी गार्डन, थाय कल्चर शो व एलीफंट शो पाहिला. फूटबॉल गेम छान होता. एक हत्ती गोलचे रक्षण करायचा व दोन हत्ती गोल करण्याचा प्रयत्न करायचे. रात्री सुप्रसिद्ध अलकाझार शोला भेट दिली. १ ॥ तासाचा हा कार्यक्रम फार मनोरंजक होता. मिनी सयामला त्यानंतर भेट दिली. या बागेतील पिसाचा झुलता मनोरा, पॅरीसचा आयफेल टॉवर, लंडनचा टॉवर ब्रीज रोषणाईत चमकत होता. दुसऱ्या दिवशी स्पीड बोटने कोरल आयलंडला गेलो. वाटेत पॅरासेलींग, (बलून पकडून, समुद्रावर आकाशात भरारी मारणे) अंडर सी वॉटर वॉक (१५ फूट पाण्याखाली चालणे) इत्यादी अनुभव घेतले. कोरल आयलंडला ग्लास बोटीने फिरून कोरल पाहिले. निळ्या पाण्यात पोहणे, फिरणे, स्कूटर राइडींग इ. केले. संध्याकाळी थाय मसाज सेंटरला भेट दिली. या ठिकाणी १ तास मसाज (शास्त्रोक्त पद्धतीने) करून घेतला. ५/६ वेळा असा मसाज केल्यास पाठदुखी, कंबरदुखी बरी होते. पट्टायावरून बँकॉकवरून येताना वाटेत जगातल्या सर्वात मोठ्या डोम्स इंडस्ट्रीजला भेट दिली. तळघरात मिनी ट्रेनने फिरून कशी प्रक्रिया होऊन दागिन्यांत लागणारे चमकदार खडे तयार होतात त्याचे प्रात्यक्षिक पाहिले. बँकॉक मुक्कामात रात्री नदीत बोटीने फेरफटका केला. संगीत, नृत्य व चमचमीत जेवण असा बोटीवर बेत होता. नदीतून फिरताना रात्रीच्या रोषणाईत बँकॉक शहर फार छान दिसत होते. दुसऱ्या दिवशी सफारी वर्ल्डला भेट दिली. बसमधून फिरताना जिराफ, झेब्रा, गेंडे, सांबर, वाघ, सिंह यांचे दर्शन घेतले. ते प्राणी पण कुतूहलाने बसकडे बघत होते. तेथील एका बागेत एक माणूस वाघ घेऊन बसला होता व त्याच्या पाठीवर हात फिरवत होता. वाघ पाळलेला होता. काहींनी त्याच्याबरोबर बसून फोटो काढले. दुसऱ्या दिवशी बुद्ध गोल्डन टेंपलला भेट दिली. येथे बुद्धाच्या सोन्याच्या मोठ्या मूर्ती आहेत. बँकॉकमधील सर्वात उंच इमारत ८४ मजल्यांची आहे. या स्कायबॉयॉक हॉटेलच्या ८४ व्या मजल्यावरून दुर्बीणीने बँकॉक शहराचे दर्शन घेतले. बँकॉकची वस्ती ६० लाख आहे. येथे सर्व गगनचुंबी इमारती आहेत. झोपडपट्टी अजिबात नाही. रस्ते रूंद असून सर्वत्र फ्लायओव्हर आहेत. पाऊस पडल्यावर पाणी लगेच वाहून जाते. चिखल अजिबात नसतो. दिवाळीच्या दिवशी एकमेकाला शुभेच्छा देऊन बँकॉकवरून सिंगापूरला आलो. दुसऱ्या दिवशी आम्ही मलेशियाला प्रयाण केले. वाटेल मल्लाका ही ऐतिहासिक नगरी बघून संध्याकाळी स्कायवे स्टेशनला आलो. येथे आशियातली सर्वात मोठी केबलकार आहे. अर्ध्या तासात केबलकारने आम्ही ६००० फूट उंचावर असलेल्या गेटींग हायलँडवर आलो. ही एका चायनीज माणसाची प्रॉपर्टी आहे. येथे पाच १८ मजली हॉटेल्स आहेत. येथे आऊटडोअर थेम पार्कस्मध्ये २४ व इनडोअर थेमपार्कस्मध्ये ११ राइडस् आहेत. रात्री रंगीत रोषणाईत या राईडस् सुंदर दिसतात. काही राईडस् व स्नो वर्ल्ड बघून तिसऱ्या दिवशी आम्ही परत केबल कारने स्कायवे स्टेशनला आलो. गेटींग हायलँडवर २ रात्री फार मजेत गेल्या. मलेशियातील मुक्कामात बटूका वटी, सनवेलगून, वॉटरपार्क, ट्वीन टॉवर्स ला भेट दिली. कौला लुंपूर टॉवर हा ४३१ मीटर उंच आहे. या टॉवरवरून आम्ही कौला लुंपूर शहराचे दर्शन घेतले. संध्याकाळी 'पुत्रजया' या मलेशियाच्या ॲडमिनिस्ट्रेटीव कॅपीटलला भेट दिली. दुसऱ्या दिवशी मलेशियाहून सिंगापूरला आल्यावर रात्री नाईट सफारीला भेट दिली. येथे ४५ मिनिटे ट्रामने जंगलात प्रवास केला. ट्राम ओपन होती. फिशींग कॅट वाघ, सिंह, गेंडे आपल्या पासून ८-१० फूटावर उभे होते. काही ठिकाणी ट्राम थांबवून आम्हाला माहिती दिली. दुसऱ्या दिवशी जोएंगबर्ड पार्कला भेट दिली. वेगवेगळ्या प्रकारचे रंगीत पक्षी होते. काहीनी पक्षी खांद्यावर ठेवून फोटो काढले. संध्याकाळी संतोसा आयलंडला भेट दिली. केबलकारने प्रवास केला. थोडे अंतर केबल कार समुद्रावरून जाते. येथे स्काय पॉवर राईड, इमेज ऑफ सिंगापूर , फोर डी सिनेमा, अंडर वॉटर वर्ल्ड म्युझीकल फाउंटन पहिला. या ठिकाणी वेळ फार मजेत गेला. १५ दिवसांची सफर आटपून आम्ही २९ ऑक्टोबरला परत आलो. गेटींग हायलँडच्या दोन रात्री, नाईट सफारी, कोरल व संतोसा आयलंड, अल्काझार शो, स्कायबॉयोक हॉटेलच्या आठवणीत मन रमून जाते.

या १५ दिवसांच्या प्रवासात आम्ही पूर्वी न घेतलेले अनेक अविस्मरणीय अनुभव घेतले. हा आमचा अत्यंत सुखाचा काळ भविष्यात आम्हाला सदैव सुख व समाधानाची जाणीव देत राहील.

**सुरेशचंद्र प्रभू**
१० शांतिनिकेतन सोसा., आंबोली,
जोगेश्वरी (प.), मुंबई ४००१०२

## ✤ आठवणी दाटतात....... मुरूडातले दिवस

'पुणे-लातूर गाडी निघाली. बार्शी करून रामलिंगचा घाट चढून हिरव्याकच्च उसाच्या रानातून चकचकीत डांबरी रस्त्यावरून बस धावते. ढोकी साखर कारखाना पार केला की दहा बारा मैलाचं पठार लागतं. पठार संपलं की समोरच्या लवणात झाडांचे पुंजके, त्यात इमारती -घरं दिसायला लागतात. हेच ते मुक्काम पोस्ट मुरूड. तालुका लातूर, जिल्हा लातूर. कोकणातलं मुरूड सगळ्यांना माहीत आहे. पण हे मुरूड फारसं परिचित नाही. दहा वर्षापूर्वी स्टेट बँकेचा शाखाधिकारी म्हणून मी इथे आलो होतो. बस स्टॅण्डमध्ये शिरली. उतरलो.

एस.टी.स्टॅण्ड ही लहान गावात बऱ्याच लोकांची विरंगुळ्याची जागा असते. लोक भटकत स्टॅण्डवर येतात. मागे हात बांधून प्रवासी न्याहळत उभं रहायचं. पेपर स्टॉलवर जाऊन पेपरवर नजर टाकायची. पच्कन् आपल्याच पायाशी थुंकायचे. पाय दुखायला लागल्यावर बाकावर बसायचे. काही जणांची तर स्टॅण्डवर जायची वेळ ठरून गेलेली असते. सकाळी दहा ते बारा बापूशा स्टॅण्डवर असणार. घरचे लोक पण हाच पत्ता देणार. स्टेट बँक कुठे आहे ? ह्या माझ्या प्रश्नावर चार रिकामटेकडे पुढे आले. त्यांनी बँकेत नेऊन सोडले.

स्टॅण्डच्या अलीकडचा एक डांबरी रस्ता पेठेतून जायचा. हा इथला एकमेव मोठा रस्ता. कडेला हॉटेल, स्टेशनरी, कापडाची दुकानं. दोन तीन दवाखाने. रस्त्यावर ट्रक, जीप आणि बऱ्याच मोटरसायकली उभ्या. किराणाची काही छोटी, काही मोठी दुकानं. जवळपासच्या खेड्यातले छोटे दुकानदार या मोठ्या दुकानातून ठोक खरेदी करीत.

स्टॅण्डच्या समोर मोठा जि. प. दवाखाना. पुढे जनता हायस्कूल. हे इथलं उत्तम शिस्तप्रिय हायस्कूल. आसपासच्या खेड्यातली मुलं इथं शिकायला येत. माझ्या मुलाला इथेच प्रवेश घेतला. हायस्कुलच्या पुढे डाव्या हाताला छोटे-छोटे बंगले असलेले विकासनगर. पुढे उजव्या हाताला एमएसईबीचं सबस्टेशन आणि त्यांची वसाहत.

तो चकाकणारा नांदेड रस्ता पुढे जाऊन, डावीकडे एक घसरतं वळण घेऊन लातूरपर्यंत धावायचा आणि पुढे अहमदपूरवरून नांदेडला जायचा.

माझ्या मित्राने इथल्या डॉ. छल्लाणी यांना फोन केला. त्यांनी त्यांचा अर्धा बंगला मला रहायला दिला. अर्ध्यामध्ये ते रहात. लांबरुंद प्लॉटमध्ये पंधरा फुटाचं गेट. गेटमध्ये वाळू पसरलेली. चाळीस एक फूट मोकळी जागा. मग बंगला सुरू होतो. दोन पायऱ्यांच्या वर शंभर फूट व्हरांडा. मोकळ्या जागेत बाग. खूप फुलझाडं. कडेला ओळीनं आकाशापर्यंत गेलेली आशोकाची झाडं. बदामाची डेरेदार झाडं. जाईजुईचा वेलमंडप. अगदी हवंहवंसं वाटणारं घर होतं. इथे सकाळ उत्साहात सुरू व्हायची.

सकाळी फिरून आलं की ट्रान्झीस्टर घेऊनं बाहेर व्हरांड्यात बसायचे. 'काय साहेब झालं का फिरणं ?' असं म्हणून डॉक्टर यायचे. आम्ही दोघं व्हरांड्यात बसायचो. ट्रान्झीस्टरवर सात पाचच्या मराठी बातम्या लावायच्या. पेपर, चहा, बातम्या आणि त्यावरची मल्लीनाथी एकदम चाले. लहान गावाबाहेरचं सकाळचं निवांत, शीतल, अल्हाददायक वातावरण. शांतता इतकी की रस्त्यावरून जाणाऱ्या माणसाच्या पावलांचा पण आवाज यावा.

डॉक्टर रसिक आणि मनमिळाऊ होते. पाणीसुद्धा एन्जॉय करत पिता येते हे मी डॉक्टरांकडून शिकलो. उन्हाळ्यात रात्री ते आले की घरातून फ्रिजमधली पाण्याची चरवी आणि दोन प्याले घेऊन व्हरांड्यात येत. मला बोलवीत. मग मांडी घालून गप्पा रंगवत चार चार प्याले पाणी आम्ही पीत असू.

साडे अकराची लातूर पुणे गाडी समोरच्या रस्त्यावरून गेल्यावरच आम्ही उठत असू. हुरड्याच्या दिवसात त्यांना पेशंटचे हुरड्याचे आमंत्रण असायचे. मग त्यांची व माझी फॅमिली मिळून हुरड्याला जात असू. आसपासच्या गावातून रात्री बेरात्री डॉक्टरांना गंभीर पेंशटसाठी बोलवणे येई. कंपनी म्हणून ते मला जीपमधून बरोबर नेत. कधी मी बरोबर नसलो तर लोक त्यांना विचारीत, 'आज बँकेच्या कुलकर्णी साहेबांना नाही आणले ?'

स्टॅण्डजवळचं मोठं मोकळं मैदान आठवडी बाजारासाठी राखीव होतं. बाजाराच्या दिवशी गावात उत्साहाचे चैतन्याचे वातावरण असे. सकाळपासून बसेस, बैलगाड्या, ट्रकमधून आसपासच्या गावातले विक्रेते आणि गावकरी 'मुर्डात' येत. 'बाजार स्पेशल' अशा गाड्या चालायच्या.

मैदानात सकाळपासून पालं पडायची. हॉटेलं लागायची. भजी वड्याचे घाणेच्या घाणे निघायचे. मिठाईच्या दुकानात दोन दोन फुट ऊंचीच्या शेवेच्या आणि जिलेबीच्या चवडी. मोठ्या ताटात साखरपेढे रचलेले. त्याला कडेनी जिलेटीन कागद गुंडाळलेला. चुरमुऱ्याची मोठी रास. शेजारी गोड्या शेवेचा ढीग. हलवाई पुकारा करी आणि मधून मधून गुडदाणी पेढ्यावरच्या टपोऱ्या हिरव्या माशा उठवण्यासाठी काठी फिरवी. भांड्यांची, प्लॅस्टीकच्या वस्तूंची सगळी दुकानं लागायची. बारा वाजल्यानंतर बाजाराला उधाण चढे. चालता येऊ नये एवढी गर्दी. दुपारी विक्रेत्यांचे पुकारे वरून ऊन तापलेले, सगळे घामाघूम झालेले. तरी पण बाजारात उत्साह ओसंडत असे.

जनता हायस्कूल शेजारच्या रस्त्यानं मैलभर अंतरावर एका रानात मारुतीचं छान देऊळ होतं. संध्याकाळी बँकेचं काम संपलं की मोटरसायकल वरून आम्ही सहकुटुंब मारूतीच्या दर्शनाला जात असू. पुढे पाव मैल गेलं की मुरूड रेल्वे स्टेशन होतं. मग स्टेशनला चक्कर मारायची. तिथं बराच वेळ बसायचे. आणि एखादी गाडी आलेली बघायची. स्टेशन मास्तर दिल्लीकडचे. ओळख वाढली. पुढं आमचं घरी येणं जाणं सुरू झालं.

बार्शी-लातूर नॅरोगेजवरचं मुरूड हे बैठं स्टेशन. तेथेच मास्तरांची क्वार्टर. त्यांच्या शेजारी गळ्यांत माळ घालणारे गंध लावणारे दोन पोर्टर. ते दारात कोंबड्या शेळ्या बाळगत.

लातूर-मिरज छोटी गाडी. लहानसे रूळ. एवढीशी चाकं. तर स्टेशन दिवाळीतल्या किल्ल्यासमोरच्या आराशीतल्या सारखं वाटे. ही गाडी सावकाश जायची. बघायला छान वाटायचं. चालत्या गाडीत चढणं सुद्धा सोपं असे. गाडी रामलिंगच्या घाटातून जाताना मजा यायची. हिरव्यागार दाट शेतामधून टाकलेल्या रुळावरून, लाल रंगाच्या टेकड्यांमधून, ओढ्यावरच्या पुलावरून जाणारी गाडी पाहताना गाडीचं दिसणं संपूच नये असं वाटायचं. या 'टॉयट्रेन'मध्ये बसण्यापेक्षा ह्या चाललेल्या पाहणंच जास्त आनंददायक असतं.

दार्जिलिंगची किंवा उटीची गाडी त्यांचा निळा रंग आणि रंगीबेरंगी प्रवासी या गाडीत नाहीत पण छोटी छोटी स्टेशनं, डोंगर घाट, नागमोडी वळणं, सावकाश जाणं, शिटी मारणं, कोळसा पाण्यासाठी मधल्या स्टेशनवर थांबणं, बंद पडणं सगळं त्या दार्जिलिंगच्या गाडीसारखं आहे. पण या बार्शीलाईटची सारखी खिल्ली उडवली गेली. 'एकच म्हैस दोनदा आडवी आली' असल्या तिच्यावरच्या विनोदामुळे तिचे आस्तित्व नाकारात्मक बनून गेलं आहे. आता तर तिचं ब्रॉड-गेजमध्ये रुपांतर होत आहे.

मुरूडमध्ये सर्वप्रकारचे व्यवसाय होते. कारखाने, तेलगिरणी, आईस फॅक्टरी, मोठी डेअरी वगैरे. मुरूडचे अडकित्ते प्रसिद्ध. गावात मोठं ग्रामीण वाचनालय होतं. त्यातली सगळी पुस्तकं आम्ही वाचली. करकळा नावाच्या खेड्यात गेलो असता सरपंचांनी ग्रामपंचायतीच्या पुस्तकाचं कपाटच माझ्यापुढे उघडं केलं. आठवड्याला चार पाच पुस्तकं आणत असू.

एकदा बँकेत दुपारच्या सुमारास फार गर्दी नव्हती. मधून खट्‌खट् असा आवाज यायला लागला. मी केबीनच्या बाहेर येऊन विचारलं. 'कसली ठोकाठोकी चाललीयं ?' माझा शेवटचा शब्द पूर्ण व्हायच्या आधीच दिसलं की एक तरूण लाकडी पायानं चालतोय. मी शरमलो. त्याच्याजवळ गेलो. चार वर्षापूर्वी तो नोकरी मिळवण्यासाठी पुण्याला गेला होता. नोकरी मिळाली नाही. रेल्वेतून पडला. पाय गमावून परत आला. जुनी शिलाई मशीन घेऊन बारीक-सारीक कामे करत चार पैसे वाचवून नवीन मशिन घेण्यासाठी बँकेत शिल्लक टाकत होता.

'तुला नवीन मशिन घेण्यासाठी बँक चार टक्के व्याजाने कर्ज देईल, पाहिजे का ?' या प्रश्नाने त्याचा चेहरा आनंदाने फुलला. मग त्याला शिलाई मशिन व इतर गोष्टी दिल्या. त्याचं चार वर्षाचं स्वप्न चार दिवसात साकार झालं. भेटायला गेल्यावर पाया पडायला लागला. म्हणाला 'मला तुमचा फोटो घरात लावायचा आहे.' मी म्हटलं 'तू गणपतीचा फोटो घरात लाव आणि तुझा फोटो मला दे. आपण पेपरला पाठवू.' काही दिवसातच स्वत:च्या पायावर उभा राहिला. त्याचा फोटो पेपरात झळकला !

एके दिवशी एकजण सकाळीच सांगत आला. 'बँकेच्या कर्जदाराचं दुकान जळालं.' मोटरसायकल काढून जागेवर गेलो. शिलाई दुकानातल्या फळ्या, मशिन, लोकांचे कपडे जळाले होते. तिशीचा कर्जदार विषण्ण चेहऱ्याने त्या जळत्या ढिगाकडे पहात होता. मी खांद्यावर हात ठेवला तसा तो रडायला लागला. त्याला 'लगेच दुकान नवीन करायला लाग' असे सांगितले. नवीन मशिन, फर्निचरसाठी कर्ज मंजूर केले. आठ दिवसात परत दुकान उभे राहिले.

तपासणीसाठी वसुलीसाठी खेड्यात जावं लागे. जनावरं पाहण्यासाठी, घरात जावं लागे. घरात गरिबी भरून राहिलेली. लोकांची 'या साहेब' म्हणायची धांदल. ओसरीवरच गोणपाट किंवा घोंगडं अंथरायचे. त्यावर तळहात फिरवून सफाई करायचे आणि 'बसा साहेब' म्हणायचे. न बसलो तर त्यांचा विरस होतो. म्हणून सगळ्यांकडे पाच मिनिटं बसायचे.

सकाळी निघणारं दूध डेअरीला नाही विकलं तर थकबाकी वाढणार. ते लेकराला पाजावं म्हणून त्या माऊलीचा जीव तुटायचा. उत्पन्नाचं दुसरं साधन नाही. थकबाकी भरा हे सांगणं सुद्धा जीवावर येई. सधन लोक सुद्धा कर्जदार होते तो भाग वेगळा.

उत्तम शाळा, सगळीकडे जाणाऱ्या बसेस, मस्त हवापाणी, दवाखान्याची-औषधाची सोय, रहायला जागा, एक थिएटर, फिरायला जायला जागा, मारुति मंदिर ह्या सगळ्या गोष्टी प्लस पॉइंट होत्या. गावात एकच थिएटर. मोठी हॉटेलं नाहीत. मोठी दुकानं नाहीत. पण काही अडलं नाही. जरी असती तरी रोज कुठे आपण खरेदीला आणि हॉटेलात जातो ?

आपण राहतो ते गाव आपलं आहे. तिथल्याच लोकांसारखे आपण आहोत. बदली होईपर्यंत आपण इथे आहोत तर आहेत ती सुखं एन्जॉय कर ही भावना मी मनात ठेवली होती. त्या गावाला कधी नावं ठेवली नाहीत. त्यामुळे हे गाव आपलं आहे ही भावना वाढीस लागली. आणि काळ सुखाचा गेला.

असे आनंदात दिवस चालले. तीन वर्ष पूर्ण झाली आणि माझ्या बदलीची ऑर्डर आली. मुरूड आवडले तरी चाकरमानी कायम राहू शकणार थोडाच ? निघायचा दिवस उजाडला. ट्रक दारात आला सामान भरले. त्याच ट्रकमधून आम्ही सहकुटुंब पुण्याला जायचे ठरवले. छल्लाणी कुटुंबीय, शेजारी, सहकारी निरोप घ्यायला जमले. वातावरण भावपूर्ण झाले होते. सगळ्यांचे डोळे भरून आले होते. आम्ही सर्वांचे निरोप घेतले. डॉक्टरांना गच्च मिठी मारली.

ट्रकच्या केबिनमध्ये बसलो आणि ट्रक निघाला. त्याच चकचकीत रस्त्यावरून, रामलिंग घाटातून पुण्याकडे.

**चंद्रकात कुलकर्णी, पुणे**
**भ्रमणध्वनी : ९८५०९१६४०६**

## ❖ जपान - एक विकसित व आदर्श राष्ट्र

अगदी लहानपणापासून ऐकत होते की जपान खूप छान देश आहे. त्याची राष्ट्रनिष्ठा वाखाणण्यासारखी आहे. 'जपानची राष्ट्रनिष्ठा' हे शब्द वरचेवर कानावर पडायचे. योगा योगाने मला जपानला जायचा योग आला व प्रत्यक्ष जपान बघण्याची संधी मिळाली. मग लक्षात आले की हा देश 'विकसित राष्ट्र' म्हणून का ओळखला जातो.

हिरोशिमा वर बॉम्बहल्ला झाला व सारा जपान हादरला. त्याची अपरिमित हानी झाली. मात्र ५० ते ६० वर्षांत हे राष्ट्र पुन्हा नुसते उभे राहिले नाही तर 'विकसित राष्ट्र' म्हणूनच उभे राहिले.

जपान तसा भौगोलिक दृष्ट्या अतिशय लहान देश. त्यातही तो ४० बेटांनी तयार झालेला. ही सर्व बेटं छोटी छोटी व विखुरलेली. चारही बाजूंनी समुद्राचा वेढा. जगाशी कुठेच संबंध नाही. डोंगराळ भाग जास्त. सतत भूकंपाचे धक्के. ज्वलंत ज्वालामुखी, फुजियामा पर्वत अशा अवघड स्थितीत असलेला हा देश 'विकसित राष्ट्र' म्हणून ओळखला जातो हे कौतुकास्पदच.

जरी निसर्गाचा कोप असला (भौगोलिक परिस्थिती) तरी या निसर्गाला कुठेही धक्का लागलेला नाही. सर्व जंगल जसेच्या तसेच. जिथे मोकळी जागा तिथेच वस्ती. १००० वर्षापूर्वीची झाडे अजूनही देव म्हणून जपान सांभाळीत आहे.

साकुराचं एक वेगळंच वरदान या जपानला लाभलेलं आहे. त्याचा पुरेपूर लाभ जपान घेत असतं. शरद ऋतु संपला की वसंताला बहर येतो. शरद ऋतुत सर्व झाडांची पाने गळून पडतात आणि वसंत लागताच मार्च-एप्रिलच्या सुमारास सर्व झाडे पाना-फुलांनी बहरून येतात. प्रत्येक झाडाची इथे निगा राखली जाते. रस्ते, घर-दार, नाले, नाल्यांचे काठ, रिकामी जागा झाडांनी घेतलेली आहे. साकुराचा (एका झाडाचं नांव) सिझन आला की लाल, पिवळी, पांढरी, निळी, गुलाबी, रंगी बेरंगी फुलं ८-१५ दिवस दिमाखांत झाडावर असतात. ही अवर्णनीय शोभा सर्वांना बघता यावी म्हणून इथे सर्वांना ९ दिवस सुटी दिली जाते आणि मग हे सारे जपानी लोक साकुराचा आनंद मोकळ्या बागेत जाऊन लुटतात. स्वच्छतेच्या बाबतीत तर विचारायलाच नको. जेव्हा वेळ मिळेल, तेव्हा ही मंडळी झाड-झटक करीत असतात. सर्व रस्ते, घरे, रेल्वे स्टेशन, रेल्वे गाडी, बसस्टॉप, बस, ऑफीसे, कंपन्या, सर्व अगदी चकाचक. आठवड्यांत एक दिवस पाऊस पडतो, त्यामुळे छपरे सुद्धा धूळ विरहित. अर्थात घराप्रमाणे रस्ताही आपला, रेल्वे आपली, (माझी) बस माझी, बसस्टॉप माझा ह्या मानसिकतेने घरांतील कचरा तर एके ठिकाणी गोळा होतोच पण अंगण झाडल्यावर तो कचरा सुद्धा घरांत (आपल्या कचरा पेटीत) टाकण्याची प्रवृत्ती ह्यांच्याकडे आहे. बस ड्रायव्हर, रेल्वेगाडी ड्रायव्हर, ऑफीस हे माझे (स्वत:चे) समजून वाहनांची व वास्तूंची वरचेवर स्वच्छता करीत असतात.

"Time is money" चा प्रत्यय इथे मिनिटा मिनिटाला येतो. ४-२१ ची बस वा रेल्वे कधीही ४-२२ ला येत नाही. ती वेळेवर येऊन वेळप्रसंगी (कुणालाही न घेता) रिकामी सुद्धा धावते. त्यामुळे ऑफीसेस, कंपन्या, शाळा, सर्व वेळेवर सुरू होऊन वेळेवर सुटतात. कामांत कुठेही कुचराई नाही. वेळप्रसंगी डबा (जेवण) सुद्धा कामाच्याच टेबलावर घेण्याची सवय असल्याने कामे पेंडींग नाहीत. त्यामुळे प्रगतीचा वेग कायम. कुठल्याही ऑफीस कामांत १५-२० मिनीटांपेक्षा जास्त वेळ द्यावा लागत नाही.

स्वभाषेविषयी त्यांचा अभिमान अगदी वाखाणण्या सारखा आहे. जागतिक भाषा म्हणून त्यांना इंग्रजीचाही आधार घ्यावासा वाटत नाही. 'टेक्नॉलॉजी'त ते अग्रेसर. पण सर्व ज्ञान त्यांच्याच भाषेतून. त्यांचे देशप्रेम तर विचारायलाच नको. ते सर्व जगाला ज्ञात आहे. तुम्ही एक शब्द जरी जपानी भाषेतून बोललात तर तुमच्या सेवेला ७० जण हजर. सेवा हा भाव तर त्यांच्या रक्ताचाच म्हणायला हवा. कुठल्याही ऑफीसमधे कामाच्या वेळांत खुर्च्यांचा वापर कमी. समोर कामासाठी कुणी आल्यास ऑफीसरसुद्धा उठून उभे राहून त्यांच्या पद्धतीने (कमरेत वाकून) नमस्कार करणार व सर्व काम उभे राहूनच करणार. तुम्हाला समजे पर्यंत (समाधान होईपर्यंत) तुमचे काम करणार.

कामात कुठेही कुचराई नाही. गप्पा, टप्पा, टाईमपास नाही. वेळेत काम होण्यासाठी रात्री १२ वाजेपर्यंत काम करण्याची तयारी. जणू कष्टासाठीच त्यांचे आयुष्य.

'विश्वास' हा जपानी लोकांचा वाखाणण्या सारखा आणखी एक गुण. एकमेकांवरील विश्वासावरच त्यांचे काम चालते. बसमधे तुम्ही स्वत: चौकशी करून पैसे टाका. ते कुणी किती टाकले हे कुणी बघणार नाही व कुणी कमीही टाकणार नाही.

रस्त्या रस्त्यावर भाजीची दुकाने, त्यावर किंमत लिहिलेली व शेजारी एक डबा. किंमत वाचून आपण विश्वासाने पैसे टाकायचे. कुणीही तिथे हजर नाही. चोरीचे भय नाही किंवा फसविण्याची भिती नाही. छोट्या छोट्या जागेत भर रस्त्यावर फुले, फळे, भाजीची शेती, पण कुणीही त्याला हात लावणार नाही.

शिस्त तर त्यांचे वैशिष्ट्यच. रस्त्यावर कितीही गाड्या असोत कुणी हॉर्न न वाजवता शांततेतच जाणार, वाहनांचा आवाज नाही. प्रदूषण विरहित वाहन. सायकलीचा वापर जास्त, सायकल, चार चाकी वाहन, पादचारी आपल्याच नियोजित जागेतून जाणार. कुणीही कुणाला ओव्हरटेक करीत नाही. शाळेतून छोटी छोटी मुलं सुद्धा 'झेब्रा' रेषेवरूनच व हिरवा दिवा लागल्यावरच रस्ता पार करणार.

सायकली जास्त म्हणून व्यायामाची वेगळी गरज नाही.

त्यामुळे पर्यावरणाला मदत व व्यायाम दोन्ही गोष्टी साध्य होतात. सकाळी उठून फिरायचा व्यायाम जणू ठरलेलाच. त्यामुळे आरोग्य उत्तम. मेडिकलचा खर्च खूप (न परवडण्यासारखा) त्यामुळे आरोग्याकडे अधिक लक्ष.

मेडिकल ट्रीटमेंट मध्ये सुद्धा औषध हे गरजेपुरतेच. अवांतर नाही. ऑपरेशन सुद्धा औषध विरहित. 'आहार हेच औषध' याचा प्रत्यय इथे येतो. जरी मांसाहार घेत असले तरी त्याच्या जोडीला, फळे, भाज्या भरपूर. त्याही तिखट, मीठ न लावता, नुसत्या उकडलेल्या. मसाले नाहीत, गोड नाही. साखरही फळापासून तयार केलेली. त्यामुळे आरोग्य व्यवस्थित व एक वेगळेच तेज सर्वांच्या चेहऱ्यावर. राम राज्याची आठवण इथे आल्याशिवाय रहात नाही. कुणीही कुरूप नाही. व्याधीग्रस्त नाही. इथे डायबेटीस, रक्तदाब, हार्ट अटॅक, सीझर या रोगा विषयी अज्ञानच म्हणायला हवे. एकमेकावरील विश्वास, शांतता, पर्यावरणाचा समतोल, नम्रता व कठोर परिश्रम, त्यामुळे भांडणे, चोरी, लबाडी नाही. जो तो आपल्या कामांत. गौतम बुद्धांनी दिलेली शिकवण तंतोतंत पाळणारे अधिक. एकसंघ समाज विखुरलेल्या जाती नाहीत त्यामुळे जातीभेद नाही.

प्रत्येक क्षेत्रांत विज्ञानाची कांस धरलेली. अधिक कामे यंत्रेच करतात. त्यामुळे कामाचा वेग व विकास साधून थोड्या काळांत पुन्हा उभे राहून जगांतील 'आदर्श विकसित राष्ट्र' निर्माण होवू शकते. जपान या राष्ट्रापासून व जपानी नागरिकांपासून आपणही पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

***- सौ. मनीषा मधुकर पुरेकर, देवपूर धुळे***

---




अरे ओळखत नाही यांना ? पलिकडच्या बँकेचे हे साहेब आहेत. ए.टी.एम. बंद आहे आणि आता शेवटची बस जाईल म्हणून दहा रूपये उसने मागत आहेत तिकीटासाठी. देऊ कां ? **- मधुकर पालकर, पुणे ३०**

## ❉ ठेवा

एकदा फिरून घ्या जगून
तुमचे तुम्हीच बालपण
ऐकली होतीत लहानपणी
राजाराणीची ती कहाणी
म्हटली होतीत छान तुम्ही
गोड, गोऽड बालगाणी
गाणी ऐकवून सांगून गोष्टी
परत एकदा ते बालपण
तुमचे तुम्हीच घ्या अनुभवून
एकदा फिरून घ्या जगून !



त्याच्या खोड्या, त्याची मस्ती
त्याचे बोल, चाल त्याची
नक्कीच होइल फोटोत बंदिस्त
परत न येणार हे क्षण मस्त
मात्र नसणार अशी वेळ
परत न रंगणार असा खेळ
फोन ऐकवेल 'नाना-नानी' फक्त
दृश्यही दिसेल लांबूनच नुस्तं
'घोडा' कसे व्हाल फोनमधून ?
आत्ताच घ्या 'घोडा घोडा' खेळून
परत, परत घ्या जगून
तुमचे बालपण फिरून फिरून !



अनमोल ठेवा वापरा जपून
तुमच्या घोड्याचा आठवही असाच
ठेवत जा मधुन मधुन
वाकल्या घोड्यासाठी ह्या
बना लहान अधुन मधुन
तुमचे तुम्हीच बालपण
वेळात वेळ काढून
जगून घ्या, फिरून फिरून



**सौ.कल्पना सुभाष कोठारे**
११ मानस, बेझंट रोड, सांताक्रूझ, मुंबई

# CAMEL & I

It is not entirely true, as some unkind critics put it, that Ahmedabad traffic is managed by donkeys. Yes, they do stand looking lost at key junctions on busy roads, the donkeys that is, but so do goats, cows, buffaloes and, if one is lucky, even an elephant. Cows do not always stand. Sometimes they sit plump at the centre of the road chewing cud and eyeing you with suspicion. That way they ensure that the traffic never gets out of control.

But the piece de resistance. literally, is the camel. He walks casually, leisurely, with total disdain, total unconcern, far above the din and the dust, literally again. No mortal is able to rush him. No vehicle- two wheeler, three wheeler, four wheeler- can disturb his equipoise. The National Highway holds no terror for him. VIP movements do not influence him. One may curse him in English or Gujarati (you will not be able to tell the difference in Ahmedabad), but he is not moved. He is beyound curse or praise. Gazing into nothingness, he walks oblivious of good or evil. Quintessence philosopher.

I was captivated. I told my wife.

"Do you know what I desire at this point of time from the bottom of my heart ?"

"No, I don't." My wife replied unnecessarily. But I was on a different planet.

"What I genuinely feel at this point of time in history is to purchase a camel when we retire (I meant when I retire), in about three months from now. That will reduce the pace of our life which is the secret of peace and happiness, more so for retired people. And then you and I will go for long, languid, soulful walks on camel-back"

My wife made a very unromantic statement that one cannot go for a walk on camel-back or horse-back or on any back for that matter.

Soon at a road junction. the camel went right, we turned left and philosophy was left in the middle.

I thought that the subject ended there for humanity.

Next day, on a clearer road where we were cruising steadily and I was giving a low whistle to a natty peacock, my driver picked up the thread.

"You were saying yesterday sir that you might like to purchase a camel."

"Eh, what?" I had forgotten what I had said in a trance as it were, as I had forgotten the wise dictum not to ignore the driver whenever you think loudly or talk confidentially in a car. Drivers are apt to have ears.

"A camel sir, that you wanted to have after retirement. I thought I should do some help. I went to the camel market in the evening yesterday, sir. A good camel could be had for about Rs. 10000 sir. Less than scooter. Dirt cheap no sir ?"

Marx may have commented about histrory coming, first as a tragedy and then as a farce (or vice versa), but this was story coming first as philosophy and then as a joke. This needed immediate straightening I thought.

"Thank you Salim, " I said, " thank you very much. Very kind of you. But we thought about it again after reaching home, me and my wife. Camel is a good idea she agreed, but there are practical difficulties. After retirement, I am settling down in a two bedroom-hall-kitchen flat in a suburb of Mumbai on the 7th floor. I do not know how to carry the camel to Mumbai by Gujarat. Mail or otherwise. I concede Gujarat Mail is a versatile train. I read in the local papers regularly how some Maganbhai or Babu-bhai left Ahmedabad for New York by Gujarat Mail the day before, but have still not heard of camels travelling by Gujarat Mail. And then there is the next journey which has to be by the local train in Mumbai, which local trains are so crowded , so crowded, that everybody hangs by the hand-hold and if your nose itches at CST, the train reaches Kalyan by the time your hand is able to make it to your nose to scratch it and satisfy the itch. Sometimes you have to be satisfied with scratching your neighbour's nose. Where will a camel fit in all this even though the camel is most foldable of all animals? And again how do I take the camel on seventh floor up to my flat ? The lift is too small and the staircase is narrow. The builders do not build houses in Mumbai keeping the needs of camel in mind. Again the rooms in my flat are only eight and half feet high and the balcony is three by six. Where do I park the camel ? So we thought, sadly and reluctantly, that scooter is better, you see my point ?

Salim saw my point and kept quiet.

**L. G. Kulkarni**,
Navi Mumbari




मन लगीन व्हयन [१]
पोरं बी गन [२] व्हयनात
मना बठ्ठा संवसार सुकना व्हयना
पन मरो तो हनुमुन का काय म्हनतस
तेच न्हायी[३] ग्या व माय ॥

लगीन ले वरीस झायं, मंग पहले गंगी झायी,
पांडू झाया, जनाबाई नी सरू झायी,
त्यांसले मोठं करता करता हनुमुन का काय म्हनतंस
तेच न्हायी ग्या व माय ॥

माले तीन ननंदा नी चार देर
बठ्ठासना [४] लगीन व्हयनात
तेस्ना संवसार मांडी देता देता हनुमुन का काय म्हनतंस
तेच न्हायी ग्या व माय ॥

आते यासले शे दमा दिन रात खो खो खोकलतंस
अन मना दुखतंस गुडघा हाऊ हनुमून कसा न्हास [५]
हायी जानारासलेच सोदन् [६] पडीन

ल्यासले सांगसू कितलाक [७] का पैसा लागेना
ह्या नही बी उनात [८] तर मी एकली इसू [९]
पन मले लई जा नि एक डाव
हनुमुन दायी द्या ।

समदं [१०] चांगलं व्हयन पर मना हनुमुन तव्हढा
न्हायी ग्या व माय ॥

(रमेश अणावकर ह्यांच्या मूळ मालवणी कवितेचा खानदेशी अहिराणी भाषेत स्वैर अनुवाद)

**- वसंत धुपकर, पुणे**

(१ झालं, २ खूप, ३ राहिला, ४ सर्वांची, ५ असतो, ६ विचारावं , ७ कितीही ८ आले ९ येईन १० सर्व)

रेखाचित्र - प्रभाकर गुपचुप

## ❈ स्वरलतेस - भावांजली

तुझ्या मायेने ओथंबल्या स्वरांतून,
तूं विचारलेस ''बाबा, होऊ कशी ऊतराई''
प्रसववेदना विसरून वात्सल्य झाले 'आई' ॥१॥
तुझ्या वात्सल्यभरल्या कंठातून
घराघरांत ऐकू आली प्रेमळ 'अंगाई'
नंदलालाला थोपटत पेंगुळली यशोदामाई ॥२॥
तुझ्या गद्‌गदल्या हृदयांतून आला टाहो
''तुझी उणीव चित्ती आई तरीही जाची''
पोरक्या मनात उमटली स्पंदने वेदनांची ॥३॥
''कल्पवृक्ष कन्येसाठी लावुनिया बाबा गेला''
कल्पवृक्षातळी तू आर्तपणे हळहळलीस,
अथांग पितृप्रेमाने अवघ्यांची मने जिंकलीस ॥४॥
अबोल 'चाफ्या'ला तूं साद घातलीस,
अंगणाअंगणातून चाफा हळूच हसला
तप्त ग्रीष्मातही 'घन निळा बरसला' ॥५॥
तुझ्या आश्वासक आवाजांत म्हणालीस
''मुली तू आलीस अपुल्या घरी''
बावरी नववधू नांदली सौख्याने सासरी ॥६॥
''भाऊबीजेला आला माझा भाऊ घरी''
ताईची माया ओसंडली तव स्वरी
चंद्र बीजेचा घरी आला दीपावली साजरी ॥७॥
तुझ्या स्वरातून दुमदुमली 'गणेशारती',
गंभीर स्वरातून झंकारली गीवार्णभारती,
रोमांचली मने स्वरगंगेच्या कांठावरती ॥८॥
तूं व्याकुळ होऊन सांगितलेस जनी,
त्यांच्यासाठी येऊ द्या डोळां पाणी,
अमुच्या मनी दाटल्या वीरांच्या आठवणी ॥९॥
पसायदान ज्ञानोबांचे, तुक्यांची अभंगवाणी,
भावगीत, भक्तीगीत, नटखट ती लावणी,
सप्तसुरांतून तुझ्या, तेजाळली किती स्वरलेणी ॥१०॥
'मधुघट' तूं भरभरूनि दिलेस किती,
द्रौपदीची थाळी जशी कधी न रिती,
सूरस्वती, गानलक्ष्मी, तूंच स्वरभारती ॥११॥
तुझ्या स्वरांनी उजळते अंबर,
फिटून जाई मनांतला अंधार,
कानी पडता तव स्वर्गीय गंधार ॥१२॥
देही संध्याछाया पसरली जरी,
हृदयांतून फुलते वसंत-उभारी
हे स्वरलते ! आम्ही शतश: आभारी ॥१३॥

***- शशांक वेचलेकर, डोंबिवली, (९५२५१-२४४७०८७)***

SBI ADVT.

**Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004**
**SSPO Pune under Postal Concession register No. L2/RNP/M/318/04-07 Date :13/05/2004**
**Licence to post without Prepayment No. : LWP-217 at Market Yard PSO, Pune - 37 on 25th of each Month**

## प्रतिक्रिया

'संवाद' चा नोव्हेंबर २००६ चा अंक वाचला. प्रतिक्रियेला बराच उशीर होतोय, तरीही आपण प्रतिक्रिया समजून घ्याल अशी अपेक्षा आहे.

नोव्हेंबरच्या 'संवाद' चे संपादकीय वाचले. थोडी गंमत वाटली आणि थोडा खेदही वाटला. जी कामं करताना संपादकांना आपला आरामाचा हक्क हिरावला जातोय असं वाटतं, ती कामं आम्ही स्त्रिया स्वेच्छानिवृत्ती (VRS) घेतल्यावर तर अग्रहक्काने करतोच, पण त्यापूर्वीही करतच होतो. माझ्या बाबतीत खरं तर सर्वच नोकरी करणाऱ्या भगिनींच्या बाबतीत चहा, स्वयंपाक ही नित्यकर्मेच. त्याबरोबरच भाजी, सामान, बिले भरणे आणि ओघानेच येणारी बाहेरची कामे मलाच करावी लागायची. दोघंही एकाच बँकेत असल्याने हे कायमच अप-डाऊन करणार. म्हणजे सकाळी ८ ला जाणार ते रात्री ९ ला येणार, आणि सासू-सासरे वयस्क. त्यामुळे घरच्या बहुतेक जबाबदाऱ्या मलाच पार पाडाव्या लागायच्या. धावपळ व्हायची, पण ही कामं आपल्यावर लादली जात आहेत असं वाटायचं नाही, उलट ते आपलं कर्तव्य आहे आणि आपणच करायला हवं असं वाटायचं.

आपण जे करतोय ते आपल्या माणसांसाठी करतोय हे लक्षात ठेवलं की कामाचं ओझं वाटत नाही, आनंद वाटतो. शिवाय त्यानिमित्ताने घराबाहेर पडणं, इतर लोकांशी संपर्क, आपलंही फिरणं अशा अनेक गोष्टी साध्य होतात. आराम, एन्जॉयमेंट हे बदल म्हणूनच ठीक असतात पण तेच आयुष्य आहे असं समजलं तर आयुष्य एकसुरी होऊन जाईल आणि आपल्याच माणसांपासून मुला-नातवंडांपासून एका बाजूला तुटून पडण्याचा धोकाही त्यात आहेच. माझा हा विरोधी सूर कदाचित आपणास आवडणार नाही, पण माझ्या वाचक भगिनी माझ्याशी सहमत असतील.

**- प्रतिभा खरे, नाशिक**

आपला सकारात्मक व विधायक दृष्टिकोन खूप आवडला. परंतु दुर्दैवाने असा दृष्टिकोन बहुतेक जणांचा नसतो ही कटू वस्तुस्थिती आहे. तेच अस्वस्थतेचं कारण आहे आणि तीच आमची व्यथा आहे. आपल्या मनमोकळ्या प्रतिक्रियेसाठी धन्यवाद ! **- संपादक मंडळ**

*******

आपण 'संवाद' च्या नोव्हेंबर २००६ च्या अंकातील संपादकीयामध्ये उल्लेख केलेल्या परिस्थितीचा आपल्यापैकी बरेचसे पेन्शनर्स आज अनुभव घेत आहेत. संपादकीयामधून आपण मांडलेली पेन्शनरांची व्यथा, तसेच अशाही परिस्थितीत आनंदाने कसे जगावे ही शिकवण आपण आपल्या 'संपादकीय' मध्ये उत्तम रीतीने मांडली आहे. त्याबद्दल धन्यवाद.

'संवाद' च्या अंकाची प्रतीक्षा असतेच तसेच अंक मिळाल्यावर तो वाचण्याची उत्सुकताही तितकीच असते.

**श्री.अरविंद धराधर, मुंबई**

**सूचना** : **१) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वतः पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादुक मंडळ जबाबदार असणार नाही.**
**२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.**

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune - 411030. Ph:24332141**

To,

**प्रकाशक :** श्री. रा. ना. लळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
**संपादक मंडळ :** सर्वश्री. वसंत धुपकर, प्रभाकर गुपचुप, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे, वसंत महाजन, क्रांतिसेन आठवले
**मुद्रक :** संविज्ञान इन्फोटेक प्रा. लि., ४९/७६३ लोकमान्य नगर, नवी पेठ, पुणे फोन : २४३३५३०५, २४३३५३२४, ३२५४११६०